राज्य महोत्सव : गणेशोत्सव
>>पान 2

शिर्डीत भक्ताची अनमोल भक्ती: १ कोटी ५८ लाखांचे सुवर्ण 'ॐ साई राम' अक्षरे साई चरणी अर्पण
>>पान 3

शिक्षकांविना शाळा... पालक पाल्यासह रस्त्यावर, प्रशासन गाफील!
>>पान 4

**सुविचार**
दुसऱ्यांचे गुण स्वीकारा.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई



ना नयनतारा, ना सामंथा, ना अनुष्का... सर्वांच्या मागून येऊन साध्यासुध्या अभिनेत्रीनं दिली १०० कोटींची हिट फिल्म
आतील पान

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 45 ■ शुक्रवार, दि. 05 सप्टेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# कितीही उपसमित्या बनवल्या तरी आरक्षण मिळवणारच

## मनोज जरांगे यांचा निर्धार, सातारा गॅझेटिअरवरून सरकारला दिला थेट इशारा

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी: मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भातील आठ मागण्यांपैकी सहा मागण्या राज्य सरकारने मान्य करत त्यासंदर्भात शासन निर्णय (जीआर) जारी केला आहे. या निर्णयानंतर गेल्या पाच दिवसांपासून मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करत असलेल्या मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन मागे घेत समाधान व्यक्त केले. मंगळवारी सायंकाळी, राज्यभरात विविध ठिकाणी मराठा समाजाकडून या निर्णयाचं सेलिब्रेशन करण्यात आलं.**



सहा महत्त्वाच्या मागण्या मान्य झाल्यामुळे आंदोलनकर्त्यांमध्ये आनंदाचं वातावरण होतं.मात्र, सरकारच्या या जीआरला आता ओबीसी नेत्यांकडून तीव्र विरोध होऊ लागला आहे. विशेषतः मंत्री छगन भुजबळ यांनी या जीआरविरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे. तर ओबीसी समाजाची नाराजी दूर करण्यासाठी सरकारने उपसमिती गठीत केली आहे. यावर भाष्य करताना मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला थेट इशारा दिलाय. तर छगन भुजबळ यांच्यावर देखील मनोज जरांगे पाटील यांनी निशाणा साधला.

छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकार परिषदेत मनोज जरांगे पाटील म्हणाले की, ओबीसीत मराठ्यांना मीच घालणार आहे. ओबीसी समाजाला जसं तुम्ही उपसमिती गठीत केली. तशीच दलित, मुस्लिमांसाठी उपसमिती गठीत करा. एक शेतकऱ्यांसाठी, आदिवासी आणि मायक्रो ओबीसींसाठी करा. गरीबांचा कल्याण होऊ द्या, असे त्यांनी म्हटले.

गेल्यावेळी ओबीसी उपसमितीच्या अध्यक्षपदी छगन भुजबळ यांची नेमणूक करण्यात आली होती. यंदा मात्र चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यामुळे छगन भुजबळ यांचे पंख कापल्याची चर्चा रंगली आहे याबाबत विचारले असता मनोज जरांगे पाटील म्हणाले की, भुजबळ म्हणजे पक्षाचं अस्तित्व संपवणारा माणूस आहे. कार्यकर्त्यांचा अस्तित्व संपवणारा माणूस आहे. त्यामुळे बावनकुळे साहेब त्यांना चांगले वाटले असतील. कोणाला केले तरी मला काय करायचं आहे? तो माझा विषय नाही. माझा विषय आरक्षण आहे मी त्यात कुठून पडलेलो आहे, असे म्हणत त्यांनी छगन भुजबळ यांच्यावर निशाणा साधला.

मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले की, कोणी कितीही आमच्यात संभ्रम निर्माण केला. तरी माझा समाज कोणावर विश्र्वास ठेवत नाही आणि मी देखील कोणावर विश्र्वास ठेवत नाही. कारण माझ्या समाजाला माहित आहे की जे आता बोलत आहेत, संभ्रम निर्माण करत आहेत हे आधी कुठे झोपलेले होते? हे आधी का येत नाहीत? बैठकांना बोलवल्यावर येत नाहीत. मुंबईत बोलवल्यावर येत नाहीत, हे कशातच नसतात. हे फक्त टीव्हीवर असतात. मला हे अभ्यासक बोलवायचे देखील नव्हते. मराठा समाजाची देखील हीच इच्छा होती. पण, मुंबईतील काही बांधव बोलले की, आपण त्यांना विश्र्वासात घेऊन सोबत घेतले पाहिजे त्यामुळे त्यांना बोलावले. परंतु हे संभ्रम निर्माण करतात. मराठा समाजात संभ्रम निर्माण होणार नाही. मी मराठवाड्यातला सर्व मराठा समाज आरक्षणात घालणार आहे. थोड्याच दिवसात मराठ्यांना हे दिसणार आहे. त्यामुळे मराठ्यांनी संभ्रम निर्माण करून घेऊ नये. पश्र्चिम महाराष्ट्रात असलेल्या सातारा गॅझेटिअरबाबत देखील सरकारने हयगय करता कामा नये, जर हे झाले नाही तर तुम्हाला मी पुन्हा रस्त्यावर फिरणे बंद करेल, असा इशारा त्यांनी यावेळी राज्य सरकारला दिला.

# छगन भुजबळांची समता परिषद मैदानात उतरणार

## ओबीसींच्या मुद्द्यावर भूमिका जाहीर, राज्यभर आंदोलन छेडण्याचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी:** मराठा आरक्षणाच्या पार्श्र्वभूमीवर राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे ओबीसी समाजात नाराजीचं वातावरण निर्माण झालं आहे. याच पार्श्र्वभूमीवर आता मंत्री छगन भुजबळ यांच्या समता परिषदेकडून ओबीसींच्या न्यायहक्कासाठी राज्यभर आंदोलन छेडण्याची घोषणा करण्यात आली आहे. मराठ्यांना आरक्षण द्यायलाच हवं, मात्र ते ओबीसींच्या ताटातलं नको, ही छगन भुजबळ यांची भूमिका रास्त असल्याचं मत समता परिषदेकडून व्यक्त करण्यात आलं आहे.



राज्य सरकारने मराठा आरक्षणाबाबत घेतलेल्या निर्णयावर छगन भुजबळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे, या निर्णयाविरोधात न्यायालयात जाण्याचाही इशारा त्यांनी दिला आहे. ओबीसी आरक्षणावर कोणतेही गालबोट न लागू देता, संविधानिक मार्गानेच मराठा समाजाला आरक्षण दिलं जावं, ही त्यांची ठाम भूमिका आहे. ओबीसी समाजाच्या हक्कांच्या संरक्षणासाठी भुजबळ कटिबद्ध असून, मंत्रीपदापेक्षा त्यांना ओबीसी नेता म्हणून ओळख मिळणं महत्त्वाचं वाटतं, असं समता परिषदेकडून सांगण्यात आलं आहे.

समता परिषदेने स्पष्ट केलं आहे की, भुजबळ मंत्रिमंडळात असोत वा नसोत, ओबीसी लढ्याच्या प्रत्येक टप्प्यावर आम्ही त्यांच्यासोबत राहू. त्यांच्या नेतृत्वात यापूर्वीही ओबीसींसाठी निर्णायक संघर्ष झाला आहे आणि आता पुन्हा एकदा ओबीसी आरक्षणावर असलेला धोका दूर करण्यासाठी राज्यभर समता परिषद विविध ठिकाणी आंदोलन करणार आहे.

समता परिषदेच्या नेत्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं की, छगन भुजबळ हे पहिले ओबीसी नेते आहेत, नंतर मंत्री. त्यांनी नेहमीच ओबीसी समाजासाठी रस्त्यावर उतरून लढा दिला आहे. त्यामुळे या वेळीही जर सरकारने ओबीसींच्या हक्कांवर गदा आणण्याचा प्रयत्न केला, तर संपूर्ण राज्यात समता परिषद ताकदीने आंदोलन करेल.

**छगन भुजबळ काय भूमिका घेणार?**

छगन भुजबळ लवकरच आपली अधिकृत भूमिका जाहीर करणार असल्याची शक्यता आहे. राज्यातील अनेक ओबीसी संघटना आणि कार्यकर्ते त्यांची वाट पाहत असून, सरकारसमोर एक नवीन आणि निर्णायक ओबीसी आंदोलन उभं राहण्याची चिन्हं दिसू लागली आहेत, आता छगन भुजबळ नेमकी काय भूमिका घेणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

**भुजबळांच्या निवासस्थानाबाहेर सुरक्षा वाढवली**

दरम्यान, मंत्री छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षणावर घेतलेल्या भूमिकेनंतर प्रशासन सतर्क झाले आहे. नाशिकमधील भुजबळ फार्म या त्यांच्या निवासस्थानी तसेच कार्यालयाबाहेर पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांकडून हे पाऊल उचलण्यात आलं आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांचा अनोखा उपक्रम; गणेशोत्सवात ५० आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना घरी भोजन

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी:** उत्सव साजरा करताना अनेकजण बडेजाव करताना दिसतात. मात्र, गणेशोत्सवाच्या निमित्तानं छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकाऱ्यांनी संवेदनशीलता दाखविणारा उपक्रम राबवला. त्यांनी सरकारी निवासस्थानात आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना ३ सप्टेंबरला निमंत्रित केलं. त्यांना स्वतःच्या हातानं भोजन वाढत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी गणेश उत्सवानिमित्त त्यांच्या शासकीय निवासस्थानी अनोखा उपक्रम राबवला. जिल्ह्यातील चार तालुक्यांमधील ५० आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना गणेशोत्सवाच्या सोहळ्यात सायंकाळच्या आरतीसाठी निमंत्रित केलं. भोजन करत असताना जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतःच्या हातानं भोजन वाढत त्यांची चौकशी केली. त्यांच्या कुटुंबियांच्या अडचणीत आणि शेती व्यवसायात येणाऱ्या समस्या जाणून घेतल्या. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला. मात्र, काही गोष्टी जाणून घेऊन आणखी काही मदत करता येईल का? हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी साकडे- गणपती बाप्पाकडं प्रत्येकजण मनोकामना मागत असतात. मात्र, स्वतःसाठी मागितलं तर इच्छा पूर्ण होत नाही इतरांसाठी मागितले तर पूर्ण होते. त्यामुळेच शेतकऱ्यांसाठी देवाला साकडे घातल्याचं जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितलं. यंदा पाऊस चांगला झाला आहे. शेतकऱ्यांचं पीक चांगलं येऊ दे. त्यांच्या शेतीमालाला चांगला भाव मिळू दे. राज्याची आणि देशाची प्रगती होऊ दे, अशी मनोकामना केल्याचं जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितलं. दरवर्षी गणेशोत्सवात वेगवगेळे उपक्रम आम्ही राबवतो. मागील वर्षी अनाथ निराधार मुलांना बोलावून त्यांच्यासोबत सण साजरा केला होता. यावेळी शेतकरी कुटुंबीयांना बोलावून समस्या जाणून घेतल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं. जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यक्रमात केले भजन सादर- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी त्यांच्या शासकीय निवासस्थानी गणेशोत्सवाचं आयोजन केलं. सर्वजाती धर्माच्या लोकांना एकत्र आणून सामाजिक सलोखा राखण्याचा प्रयत्न करत असल्याचं स्वामी यांनी यावेळी सांगितले.

## केंद्राचा जीएसटी कपातचा निर्णय म्हणजे अमेरिकेच्या ट्रम्प टॅरिफला चोख प्रत्युत्तर; एकनाथ शिंदेंनी सांगितलं गणित

**मुंबई/प्रतिनिधी:** केंद्र सरकारने जीएसटीच्या स्लॅबमध्ये मोठा बदल केला असून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लाल किल्ल्यावरुन सांगितल्याप्रमाणे सर्वसामान्यांना दिवाळीची भेट देण्यात आली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी जीएसटी २.० अंतर्गत अनेक मोठ्या जीएसटी सुधारणांची घोषणा केली. त्यानुसार, आधी असलेल्या जीएसटीच्या चार स्लॅबपैकी १२ टक्के आणि २८ टक्क्यांचा स्लॅब रद्द करण्यात आला. त्यामुळे देशात आता फक्त ५ टक्के आणि १८ टक्के असेल दोनच जीएसटी स्लॅब असतील. मोदी सरकारच्या या निर्णयाचं सर्वत्र स्वागत केलं जात असून राजकीय प्रतिक्रिया देखील समोर येत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यानंतर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील यावर प्रतिक्रिया देत विरोधकांना टोला लगावला. तसेच, अमेरिकेच्या ट्रम्प टॅरिफला भारताने चोख उत्तर दिलंय, असेही शिंदेंनी म्हटले.जीएसटी स्लॅब कपातीच्या निर्णयाचा विरोधक देखील फायदा घेणार आहेत, त्यामुळे टीका करताना विरोधकांना मोदीजींच अभिनंदन करावंच लागेल. खऱ्या अर्थाने देशवासीयांची दिवाळी गोड आणि आनंदी करण्याचं काम प्रधानमंत्री मोदींनी केलेलं आहे, त्यांचं मी मनापासून अभिनंदन करतो, त्यांना धन्यवाद देतो.

# ओबीसी महासंघाचे नागपूरमधील उपोषण मागे

## १४ पैकी १२ मागण्या सरकारकडून मान्य, एका महिन्यात जीआर काढणार; अतुल सावेंची मध्यस्थी फळाला

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी:** एकीकडे मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण सुरु केले होते. तर दुसरीकडे मराठा समाजाला ओबीसींमधून आरक्षण देऊ नये, या मागणीसाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे संविधान चौकात बबनराव तायवाडे यांच्या नेतृत्वात गेल्या सहा दिवसांपासून साखळी उपोषण सुरु करण्यात आले होते. आज मंत्री अतुल सावे यांनी उपोषण स्थळी भेट दिली. ओबीसी समाजाच्या १४ मागण्यांपैकी १२ मागण्या सरकारने मान्य केल्याची माहिती अतुल सावे यांनी दिल्यानंतर बबनराव तायवाडे यांनी अखेर उपोषण मागे घेतले.

अतुल सावे म्हणाले की, ओबीसी आरक्षणाला गदा येणार नाही याची काळजी घेतली आहे. शेतकऱ्यांचे अतिवृष्टीने जे नुकसान झाले त्यावर प्रक्रिया सुरु केली आहे. ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचा विषय आम्ही अर्थ मंत्रालयाकडे पाठवला आहे. राष्ट्रीय ओबीसी महासंघाने आपल्या एकूण १४ मागण्या मांडल्या आहेत. ओबीसी वसतिगृहासाठी नागपूरमध्ये दोन इमारती उपलब्ध करून दिल्या जाण्याचा निर्णय झाला आहे. ओबीसी आर्थिक विकास महामंडळाच्या मागण्यांबाबत आम्ही सकारात्मक आहोत. १८ महामंडळ तयार केली आहेत. ५-५ कोटी रुपयांचा निधी दिलाय, आता ५०-५० कोटी निधी प्रत्येक महामंडळाला देणार आहोत. जिल्ह्याच्या ठिकाणी ओबीसींसाठी अभ्यासिका सुरु करु. महामंडळांना एक हजार कोटी पेक्षा जास्त निधी उपलब्ध होणार आहे, असे त्यांनी म्हटले.

**एक महिन्याच्या आत शासन आदेश काढले जाईल**

राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या १२ मागण्या आज सरकारने मान्य केल्या आहेत. आता आपण आपले उपोषण मागे घ्यावे अशी विनंती मंत्री अतुल सावे यांनी बबनराव तायवाडे यांना केली. यानंतर बबनराव तायवाडे यांनी उपोषण थांबवल्याची घोषणा केली. दरम्यान, एक महिन्याच्या आत ओबीसींच्या सर्व मागण्यांचे शासन आदेश काढले जाईल, असे आश्र्वसन अतुल सावे यांनी दिले.

**काय होत्या ओबीसींच्या मागण्या?**

१) मराठा जातीचा ओबीसी संवर्गात समावेश करण्यात येऊ नये व सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात येऊ नये.

२) अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतक-यांना त्वरीत नुकसान भरपाई देण्यात यावी.

३) ओबीसी मुलांना व्यावसायीक अभ्यासक्रमास १०० टक्के शिष्यवृत्ती लागु करण्यात यावी.

४) गुणवंत मुलांमुलीना परदेशात उच्च शिक्षणासाठी देण्यात येणारी शिष्यवृत्ती ७५ विद्यार्थ्यांची संख्या वाढवुन २०० विद्यार्थी करण्यात यावी.

५) महाज्योती या संस्थेकरीता एक हजार कोटी रूपयांची तरतुद करण्यात यावी, शासन निर्णय दिनांक २८ आक्टो. २०२१ च्या नुसार ज्या प्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी च्या शासन निर्णयानुसार समाजातील संस्थाना कामात प्राधान्य देण्यात येते, त्याप्रमाणे महाज्योतीची कामे ओबीसी, विजा, भज व विशेष मागास प्रवर्गातील संस्थेला रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी प्राधाण्य देण्यात यावे.

६) म्हाडा व सिडको तर्फे बांधुन देण्यात येणा-या घरकुल योजनेत ओबीसी संवर्गाकरीता आरक्षण लागु करण्यात यावे.

७) नागपुर येथे तयार असलेले उच्च व तंत्र विभागाचे स्व. यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षानिमीत्त बांधलेले २०० मुलींचे तयार वसतीगृह तसेच नागपुर येथे स्व. वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्षानिमीत्त तयार असलेले २०० मुलांचे वसतीगृह ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी संवर्गातील विद्यार्थ्यांच्या वसतीगृहासाठी ओबीसी बहुजन कल्याण विभागाकडे हस्तांतरीत करून शासन निर्णयान्वये इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागामार्फत मुलांचे व मुलींचे वसतीगृह सुरू करण्यात यावे.





८) ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी आर्थिक विकास महामंडळा मफित असलेली थेट कर्ज योजनेची मर्यादा १ लाख व १५ लाख रुपये कर्ज मर्यादेच्या योजनेसाठी, तसेच गहाण खतामध्ये फक्त शेतीची अट असून ती शिथिल करण्यात यावी घर., प्लॉट, दुकान इत्यादी बाबींचा समावेश व्हावा जामीनदार घेतांना केवळ सरकारी. नौकरच असावा ही अट शिथिल करण्यात यावी, ५०० सीबील स्कोरची अट शिथिल करुन लाभ धारकांना अटच नसावी.

९) शामराव पेजे आर्थिक विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ या धर्तीवर इतर मागास आर्थिक विकास महामंडळाला अँड जनार्दन पाटील ओबीसी आर्थिक विकास महामंडळ असे नाव द्यावे.

१०) प्रत्येक शहर व तालुका स्तरावर ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज ग्रंथालय सुरु करण्यात यावे.

११) डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार आणि आदिवासी सेवक पुरस्कार याप्रमाणे डॉ पंजाबराव देशमुख ओबीसी समाजसेवक पुरस्कार जाहीर करण्यात यावा.

१२) अनुसूचित जातीजमाती प्रमाणे ओबीसी, विजा, भज व विशेष मागास प्रवर्ग शेतकरुयांना १०० टक्के सवलतीवर राज्यात योजना सुरु करण्यात याव्यात.

१३) ओबीसी आर्थिक विकास महामंडळाला एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी व महामंडळाच्या सर्व मंजूर योजना त्वरीत सुरु करण्यात याव्यात.

१४) ओबीसी, वीजा, भज व विमाप्र समुदायातील पीएचडी संशोधक विद्यार्थांची तीन वर्षापासून प्रलंबित असणारी फेलोशिप त्वरित अदा करण्यात यावी.

दरम्यान, १४ मागण्यांपैकी १२ मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत. यापैकी ३ व १३ व्या मागणीवर मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून त्यावर तोडगा काढला जाणार आहे.

## शिक्षक दिन!

आज ५ सप्टेंबर, आजचा दिवस संपूर्ण देशात शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा आज जन्मदिवस. त्यांच्याच स्मरणार्थ आजचा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. १९६२ मध्ये राधाकृष्णन यांनी राष्ट्रपती पदाची शपथ घेतली तेव्हा त्यांनी त्यांचा जन्मदिवस हा शिक्षकांचा गौरव दिवस म्हणून साजरा करण्याची इच्छा प्रकट केली होती. देशातील शिक्षकांचा गौरव हाच आपला गौरव असल्याची त्यांनी सांगितले होते. तेव्हापासून सुरू झालेली ही परंपरा अजूनही सुरूच असून भविष्यातही सुरूच राहील. आपल्या संस्कृतीत शिक्षकाला म्हणजे गुरूला मानाचे स्थान आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडणीत गुरूंची म्हणजे शिक्षकांची भूमिका खूप महत्वाची असते. शिक्षक हा केवळ मार्गदर्शक नसतो तर तो जीवनाला दिशा दाखवणारा दिशादर्शक असतो. भारतीय शिक्षण परंपरेत गुरू शिष्यांचा संबंध अत्यंत पवित्र मानला आहे. प्राचीन काळी गुरुकुल पध्दत होती. विद्यार्जन करण्यासाठी विद्यार्थी घरदार सोडून गुरूच्या घरी राहण्यास येत असे. गुरू हा त्या शिष्यांच्या मातापित्यांची जागा घेत असे. शिष्याला केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर शिष्याला चारित्र्यसंपन्न करणे हे आपले कर्तव्य आहे या विचारप्रेरणेतून गुरू विद्यादान करत असे. शिष्याच्या जीवनात गुरुला सर्वोच्च स्थान असत आणि गुरूच्या जीवनातही शिष्याला सर्वोच्च प्राधान्य असे. याप्रमाणे त्याकाळी गुरू शिष्य संबंध पवित्र बंधनाने युक्त होते. आज काळ बदलला असला तरी शिक्षकांचे महत्व कमी झाले नाही. आजच्या विज्ञान युगातही पूर्वीप्रमाणेच शिक्षकांची आवश्यकता भासते. मनुष्याच्या जीवनातून शिक्षक वजा होऊच शकत नाही. जर शिक्षकच नसेल तर मनुष्याच्या जीवनाची दिशा भरकटू शकते. मनुष्याचे जीवन भरकटलेल्या नौकेसारखे होईल म्हणूनच शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली जाते. केवळ आपल्याच देशात नव्हे तर ऑस्ट्रेलिया, कॅनडा, ब्राझील, जर्मनी, जपान, इंडोनेशिया, मलेशिया, चिली या देशातही शिक्षक दिन साजरा केला जातो मात्र तिथे हा दिवस ५ ऑक्टोबरला साजरा केला जातो. आपल्या देशात हा दिवस ५ सप्टेंबरला साजरा केला जातो. कारण याच दिवशी १८८८ साली भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्म तामिळनाडूतील तिरुथानी या गावी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. अतिशय हुशार व कुशाग्र बुद्धीचे असल्याने त्यांनी शिक्षण क्षेत्रात स्वतःचे वेगळे वलय निर्माण केले. आंध्र विद्यापीठ आणि बनारस विश्व विद्यापीठाचे कुलगुरुपद त्यांनी भूषवले. १९३१ ते १९३९ या काळात ते संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रतिनिधी होते. १९४९ ते १९५२ पर्यंत ते रशियामधील भारताचे राजदूत होते. १९५२ साली ते भारताचे पहिले उपराष्ट्रपती बनले. या पदावर दहा वर्ष राहिल्यानंतर १९६२ साली ते भारताचे दुसरे राष्ट्रपती बनले. १९५४ साली त्यांना भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने गौरविण्यात आले. शुद्ध चारित्र्य, प्रकांड पांडित्य, अपार सहिष्णुता आणि प्रभावी वक्तृत्व यामुळे डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी जगभर विलक्षण लोकप्रियता मिळवली म्हणूनच नोबेल पुरस्कारासाठी त्यांना तब्बल २७ वेळा नामांकन मिळाले. शिक्षक ते राष्ट्रपती ही त्यांची वाटचाल त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष आहे. त्यांच्या याच कर्तृत्वाचा सन्मान म्हणून सरकारने १९६२ पासून त्यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करायला सुरवात केली. आजच्या या शिक्षक दिनी देशभरातील शिक्षक बंधू भगिनींना शिक्षक दिनाच्या मनापासून शुभेच्छा!

# राज्य महोत्सव : गणेशोत्सव

गणेशोत्सव हा महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात अतिशय उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरा केला जाणारा महत्त्वपूर्ण सण आहे. श्री गणेश हे विघ्नहर्ता, बुद्धीचे दैवत व मंगलकार्याचे अधिपती मानले जातात. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यचळवळीच्या काळात या उत्सवाला सार्वजनिक रूप दिले. त्यामागचा उद्देश समाजातील एकता वाढवणे व स्वराज्याच्या लढ्यासाठी लोकांना एकत्र आणणे हा होता. त्यामुळे गणेशोत्सवाला सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिकही महत्त्व प्राप्त झाले.

गणेशोत्सव हा फक्त धार्मिक उत्सव नसून तो समाजाला एकत्र बांधणारा, संस्कृती जपणारा आणि पर्यावरणपूरकतेचा संदेश देणारा प्रेरणादायी उत्सव आहे. गणेशोत्सवाच्या काळात राज्यात मोठ्या प्रमाणात पर्यटन, त्यावर आधारित विविध उद्योग व व्यवसाय यांना मोठ्या प्रमाणात चालना मिळते. राज्याची परंपरा व संस्कृती जपली जाते. ही परंपरा आणि संस्कृती अधिक वृद्धिंगत व्हावी यासाठी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी आपला गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याची १८ जुलै २०२५ रोजी विधीमंडळात घोषणा केली. त्यानुसार शासनाने १४ ऑगस्ट २०२५ रोजी गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून जाहीर केले.

गणेशोत्सवाला शासनाकडून राज्य महोत्सवाचा दर्जा देण्यात आल्यानंतर या महोत्सवांतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रम आणि इतर कार्यक्रम समन्वयनासाठी पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई या कार्यालयाकडे जबाबदारी देण्यात आली.

**घरगुती तसेच सार्वजनिक श्री गणेश मंडळे**

या गणेशोत्सव काळात घरगुती आणि सार्वजनिक गणेश मंडळांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहेत. याअंतर्गत महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचा या वर्षापासून तालुकास्तरापर्यंत विस्तार करण्यात आला. यात राज्यस्तरीय प्रथम विजेत्याला रूपये ७.५० लाख तर जिल्हास्तरावरीय प्रथम



विजेत्यास रूपये ५० हजार आणि तालुकास्तरीय विजेत्यांना रूपये २५ हजार व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. आजमितीस महाराष्ट्रभरातील ४०४ पेक्षा जास्त मंडळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. घरोघरीच्या श्री गणेशांचे दर्शन व सार्वजनिक मंडळांच्या श्री गणेशांचे दर्शन घरबसल्या घेणे शक्य व्हावे यासाठी घरगुती व सार्वजनिक श्री गणेशांचे छायाचित्र अपलोड करण्यासाठी स्वतंत्र पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले. पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या https://ganeshotsav.pldmka.co.in या पोर्टलद्वारे मोठ्या संख्येने भाविक आपल्या श्री गणेशांची छायाचित्रे सर्व गणेशभक्तांच्या दर्शनासाठी अपलोड करत आहेत. या पोर्टलद्वारे आजवर २०० हून अधिक जणांनी आपल्या घरच्या व ७० हून अधिक सार्वजनिक मंडळांनी फोटो अपलोड केले आहेत.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध गणपती मंदिरे व प्रसिद्ध सार्वजनिक मंडळाच्या गणपतींचे थेट दर्शन जगभरातील गणेशभक्तांना एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावे, याकरिता सुरू करण्यात आलेल्या पोर्टलला देखील गणेशभक्तांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभत आहे. या पोर्टलमुळे प्रामुख्याने मुंबईचा लालबागचा राजा, मुंबईचा राजा, खेतवाडीचा गणराज, पुण्याचा दगडूशेठ हलवाई, श्री सिद्धिविनायक मंदिरातील सिद्धिविनायकाचे दर्शन, अष्टविनायकांचे व टिटवाळ्याच्या गणपतीचे दर्शन एकाच क्लिकवर उपलब्ध झाले आहे. या दोन्ही पोर्टलमुळे जगभरातील गणेशभक्तांना घरबसल्या विविध जिल्ह्यातील व शहरातील गणपतींचे अतिशय सुलभ दर्शन होत आहे.

**भजनी मंडळ**

गणेशोत्सव काळात भजनी मंडळांचा मोठा सहभाग असतो. याच अनुषंगाने राज्यातील नोंदणीकृत तसेच भजन क्षेत्रातील शिखर संस्थांना रूपये ५ कोटी अनुदान देण्याबाबतची तरतूद करण्यात आली. राज्यात १८०० भजनी मंडळे नोंदणीकृत असून त्यांना प्रत्येकी २५ हजार रूपये अनुदान म्हणून देण्यात येणार आहे.

**रील स्पर्धा**

गणेशोत्सवाला रील स्पर्धेच्या माध्यमातून देश-विदेशात नवे आयाम मिळावे, यासाठी महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या वतीने रील स्पर्धेचे आयोजन देखील करण्यात आलेले आहे. ही स्पर्धा राज्यातील महसूल विभागीय स्तर, राज्यस्तर आणि महाराष्ट्राबाहेर व भारताबाहेरील खुला गट अशा तीन गटात होत आहे. रील तयार करण्यासाठी पर्यावरण संवर्धन, स्वदेशी, गडकिल्ले, संस्कृती, ऑपरेशन सिंदूर या थीम मध्यवर्ती ठेवून ३० सेकंद ते ६० सेकंदापर्यंत रील तयार करावयाची आहे.

**संजय डी.ओरके**
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई

महसूल विभागीय स्तरावरील विजेत्या स्पर्धकाला प्रथम पारितोषिक २५ हजार रुपये, द्वितीय पारितोषिक रुपये १५ हजार, तृतीय पारितोषिक १० हजार, उतेजनार्थ विजेत्यास ५ हजार अशा स्वरुपात पारितोषिक दिले जाईल. या स्पर्धेतील राज्यस्तरावरील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास १ लाख रुपये, द्वितीय पारितोषिक ७५ हजार रुपये, तृतीय पारितोषिक ५० हजार रुपये, उतेजनार्थ पारितोषिक २५ हजार रुपये देण्यात येईल. तर महाराष्ट्र व भारताबाहेरील विजेत्या गटातील स्पर्धकाला प्रथम क्रमांकाचे १ लाख रुपये बक्षीस, द्वितीय क्रमांकासाठी ७५ हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी ५० हजार रुपये, उतेजनार्थ म्हणून २५ हजार रुपये देण्यात येणार आहे.

**विशेष उपक्रम**

गणेशोत्सवाच्या १० दिवसाच्या काळात राज्याच्या प्रत्येक विभागात विशेष उपक्रम, स्पर्धा, रोषणाई आदींसह विशेष उपक्रम अंतर्गत ''ऑपरेशन सिंदूर''द्वारे माजी सैनिकांचा जिल्हानिहाय सत्कार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर आत्मनिर्भर भारत व स्वदेशी संकल्पना राबविणाऱ्या व्यक्तींचाही गौरव करण्यात येणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार यांच्या संकल्पनेतील वर्ल्ड युनेस्को मानांकन मिळालेले छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले, ऑपरेशन सिंदूर, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी संकल्पना असे विविध विषय घेऊनही हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. श्री गणेशाला वंदन करण्यासाठी पु.ल.देशपांडे अकादमीकडून 'आला रे आला गणराया आला' या विशेष गीताचीही निर्मिती करण्यात आली.


**जागतिक व्यासपीठ**

गणेशोत्सवानिमित्त कलाकारांना महाराष्ट्र राज्याबाहेर देखील व्यासपीठ मिळणार आहे. याचाच एक भाग म्हणून २७ ते २९ ऑगस्ट, २०२५ दरम्यान वन संशोधन केंद्र डेहराडून या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आला. नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन येथे १ सप्टेंबर २०२५ सांस्कृतिक कार्यक्रम झाला तर ३ सप्टेंबर २०२५ रोजी के एम गिरी सभागृह, बेळगाव या सीमावर्ती भागात गणेशोत्सवाचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले. सर सयाजीराव नगर वडोदरा गुजरात या ठिकाणी म्हणजेच ४ सप्टेंबर २०२५ रोजी भाग्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच ५ सप्टेंबर २०२५ रोजी गोवा राज्यात मराठी बांधवांसाठी भव्य संस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. गणेशोत्सवाला ''राज्य महोत्सव'' दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशात एक भरीव वाढ झाली आहे. लोकसहभाग, डिजिटल प्रसार, आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता आणि पर्यावरणपूरक उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ धार्मिक न राहता जगाला एकत्र आणणारा सांस्कृतिक सोहळा ठरणार, हे नक्की.

# स्मार्ट व इंटेलिजंट गावांकडे महाराष्ट्राची वाटचाल

## 'सातनवरी' ठरले देशातील पहिले स्मार्ट व इंटेलिजंट गाव

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी 'खेड्यांकडे परत चला' असा संदेश देत ग्रामीण भारताचे देश विकासात महत्त्व अधोरेखित केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनीही 'गाव करी ते राव न करी' असे उद्बोधन करुन आदर्श ग्रामीण भारताची संकल्पना 'ग्रामगीता' या ग्रंथातून मांडली. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व व पुढाकाराने हा ग्रामीण भारत आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्मार्ट व इंटेलिजंट होण्याच्या दृष्टीने पाऊल पुढे पडले आहे. नागपूर ग्रामीणमधील सातनवरी गावात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रायोगिक तत्वावर नुकतेच देशातील पहिल्या स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ केला. स्मार्ट सिंचन, ड्रोनद्वारे किटकनाशके व खत फवारणी, मत्स्यव्यवसाय, सिंचन, आरोग्य, शिक्षण, बँक ऑन व्हिल, स्मार्ट टेहळणी आदी १८ सेवा आधुनिक तंत्रज्ञानाच्या व मुख्यत्वे भारतीय कंपन्यांद्वारे पुरविल्या जात असल्याने हे एक आत्मनिर्भर भारताद्वारे समृद्ध गाव करण्यासाठीचे उत्तम उदाहरण ठरले आहे.




महाराष्ट्राने भारत देशाला स्वातंर्त्य करण्यात व येथील सामाजिक उत्थानासाठी मोलाचे योगदान दिले आहे. स्वातंर्त्योत्तर भारताला रोजगार हमी योजना, माहितीचा अधिकार, महिलांना आरक्षण असे क्रांतीकारी पाऊल उचलत पुढे देशभर त्याची अंमलबजावणी झाली आहे. महाराष्ट्राने देशाला दिलेल्या या महत्वाच्या योगदानात आता स्मार्ट व इंटेलिजंट गावाची भर पडणार आहे. देशातील पहिल्या स्मार्ट व इंटेलिजंट गावाचा शुभारंभ करतानाच राज्यातील प्रत्येक तालुक्यामधील १० अशी सुमारे ३ हजार ५०० गावे पहिल्या टप्प्यात स्मार्ट व इंटेलिजंट करण्याचा मनोदय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त करत ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरा-मोहरा बदलवून समृद्ध गावांद्वारे भारतीय स्वातंर्त्याच्या शतक वर्षपूर्ती निमित्त संपूर्ण विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून देशाला उद्देशून केलेल्या संबोधनात ग्रामीण भारत तंत्रज्ञानाद्वारे विकास पथावर अग्रेसर करण्याची घोषणा करत 'भारतनेट' हा गावा-गावांना इंटरनेटद्वारे जोडण्याचा व पर्यायाने जगाशी ग्रामीण भारताचा संवाद घडविण्यासाठी पुढाकार घेतला. महाराष्ट्रात भारतनेट उपक्रमांतर्गत २०१९ मध्ये पहिल्या टप्प्याची यशस्वी अंमलबजावणी झाली व दुसऱ्या टप्प्यासही सुरूवात झाली. राज्याने भारतनेटच्या धर्तीवर 'महानेट' कार्यक्रम हाती घेत त्याची अंमलबजावणीही सुरू केली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य शासनाने विविध महत्त्वाचे निर्णय घेऊन राज्याला सर्व क्षेत्रात अग्रेसर बनविण्यासाठी पुढाकार घेतला असून कृत्रिम बुद्धीमत्तेच्या वापराद्वारे प्रशासनाला गती व सर्व सामान्यांना उत्तम सोई-सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीनेही निर्णय घेण्यात आले. ग्रामीण महाराष्ट्रालाही उत्तम सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व पर्यायाने गावातील सामान्य माणसाला सबळ करण्यासाठी स्मार्ट व इंटेलिजंट बनविण्याचा महत्वाकांक्षी उपक्रम मुख्यमंत्री फडणवीस यांनी हाती घेतला.

**आत्मनिर्भर भारताद्वारे समृद्ध गाव**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारतातच देशवासियांच्या गरजा पूर्ण करण्याकरिता सर्व क्षेत्रांना आवाहन करत आत्मनिर्भर भारताची संकल्पना मांडली. याला प्रतिसाद देत देशात विविध क्षेत्रांमध्ये देशी बनावटीच्या वस्तू व तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात विकसित होत आहे. याच दिशेने एक पाऊल पुढे जात केंद्रीय दूरसंचार मंत्रालयांतर्गत कार्यरत व्हाईस ऑफ इंडियन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी एंटरप्रायजेसने (व्हाईस) देशांतर्गत कंपन्यांच्या संघटनांसोबत एकत्र येत देशातील स्मार्ट इंटेलिजंट गाव बनविण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्री फडणवीस यांच्या समक्ष ठेवला व त्यास तत्काळ सकारात्मक प्रतिसाद देत हा महत्वाकांक्षी प्रकल्प महाराष्ट्रात राबविण्याचे ठरले. त्यानुसार व्हाईस कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नागपूर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांची भेट घेतली. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासोबत बैठक होवून हा प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक असलेली भौगोलिक व अनुषांगिक सर्व सज्जता असलेल्या नागपूर ग्रामीण मधील गटग्रामपंचायत सातनवरी या १८०० लोकवस्तीच्या गावाची निवड देशातील हा प्रायोगिक प्रकल्प राबविण्यासाठी झाली व त्यास मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली.

गेल्या दोन महिन्यापासून स्थानिक प्रशासनाने आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आणि व्हाईस कंपनीने सातनवरी गावात मुक्काम ठोकला व या गावाला स्मार्ट इंटेलिजंट गाव बनविण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही पूर्ण करण्याच्या दिशेने काम झाले. या प्रकल्पाच्या प्रगतीचा मुख्य सचिव राजेश कुमार, मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव श्रीकर परदेशी व व्हाईस कंपनीचे वरिष्ठ पदाधिकारी यांनी वेळोवेळी आढावा घेतला.

**असे होत आहे सातनवरी स्मार्ट व इंटेलिजंट**

सातनवरी गाव इंटरनेट सुविधांनी पूर्णपणे जोडण्यात आले आहे. वायफाय, हॉटस्पॉट आदींचा उपयोगही मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. ग्रामपंचायत ते गावातील घरे, संस्था आणि गावात वायफाय, फायबर टु द होम (फटीटीएच), सॅटेलाईट सुविधा, ४ जी, ५ जी व अन्य वायरलेस तंत्रज्ञानाचा उपयोग करून ब्रॉडबॅन्डची उपलब्धता मोठ्या प्रमाणात करून देण्यात आली आहे. स्मार्ट शेतीला प्राधान्य देवून गावातील शेतांमध्ये सेन्सर बसविण्यात आले आहे. याद्वारे शेतीतील पेरणीपासून कापणीपर्यंत तसेच बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सुविधा, माहिती, पीक पद्धतीचे नियोजन आदी सर्व माहिती डॅशबोर्डवर उपलब्ध झाली आहे. या गावातील शेतकरी ड्रोन व सेन्सर आदींचा उपयोग करून माती परिक्षण, फवारणी, खते आदींच्या योग्य नियोजनाद्वारे पर्यावरणपूरक शेतीसह उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्याच्या दिशेने अग्रेसर झाले आहे. तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे गावातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता सुधारल्याने गावकऱ्यांचे आरोग्य सुधारत आहे. हेल्थ कार्ड, टेलिमेडिसिन आदींचा उपयोग होवून गावातच आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध होत आहे व शहरांकडे होणारी गावकऱ्यांची पायपीट आता थांबत आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील तज्ज्ञ डॉक्टर या उपक्रमामध्ये सहभागी होवून ग्रामस्थांना आरोग्य सुविधांचा लाभ देत आहेत. गावात प्राथमिक शिक्षणात कृत्रिम बुद्धीमत्ता व स्मार्ट शिक्षणाचा उपयोग होवून वैश्विक ज्ञान विद्यार्थ्यांना मिळत आहे. शाळा व अंगणवाडीमध्ये स्मार्ट ईसीसीई व्हिडियो मार्गदर्शन पुस्तक, एआयच्या माध्यमातून रिमोट क्लासरूम तसेच डिजिटल अंगणवाडी केंद्र या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. या गावात ई-स्कील सेंटर, मोबाईल हेल्थ कनेक्टिविटी आदी सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. संगणकामुळे ग्रामपंचयातमधील सर्व कामे जलद गतीने पूर्ण होत आहेत. तसेच ग्रामस्थांना वायफायच्या माध्यमातून गाव व शहराशी जोडणे सुलभ झाले आहे. गावातील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, तलावांमधील मत्स्यपालनासाठी आवश्यक असलेल्या पाण्यातील घटकांची माहिती डॅशबोर्डवर दिसत आहे. ग्रामपंचायतीने स्मार्ट पथदिवे लावले असून यामुळे विजेची बचत होत आहे. स्मार्ट कॅमेरांचा उपयोग करून गावात ठिकठिकाणी टेहळणी सुरू आहे. कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करून गावातील पेयजल वितरण व गुणवत्ता नियमन करण्यात येत आहे. स्मार्ट गर्व्हनन्स, स्मार्ट कचरा व्यवस्थापन आणि स्मार्ट अग्निशमन व्यवस्था उभारण्यात आली आहे.

तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे जगात विविध क्षेत्रात क्रांती घडत आहे. भारतातही तंत्रज्ञान क्षेत्रातील स्वदेशी कंपन्यांनी एकत्र येऊन समृद्ध गावाचा आदर्श निर्माण करण्याचा ध्यास धरला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रकल्पास पूर्ण सहकार्य देऊन देशाला दिशादर्शक ठरेल असे सातनवरी गाव स्मार्ट व इंटेलिजंट करण्यासाठी स्थानिक प्रशासन व राज्य शासनाची संपूर्ण मदत दिली. त्यातून उभे राहिलेले हे गाव आता प्रगतीच्या वाटेवर आरूढ झाले असून आधुनिक जगातील एक आदर्श गाव म्हणून सातनवरी नक्कीच आपली ओळख भारतासह जगाला करून देईल याची खात्री पटते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### नेटशेड व सबसिडीच्या आमिषाने शेतकऱ्यांची ६६ लाखांची फसवणूक; माधव पाटील अटकेत

दैनिक आपला विदर्भ

**खामगाव/प्रतिनिधी:** शासनाकडून अनुदान मिळवून देण्याचे तसेच कमी किमतीत नेटशेड उभारून देण्याचे आमिष दाखवत खामगाव तालुक्यातील सात शेतकऱ्यांची तब्बल ६६ लाख ८० हजार २२९ रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी माधव मोतीराम पांढरे उर्फ पाटील याला अटक करण्यात आली आहे.

शेतकरी मोहन लक्ष्मण फाळके यांच्या तक्रारीनुसार, २७ ऑक्टोबर २०१२ ते ४ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत अटाळी गावात हा प्रकार घडला. आरोपीने सबसिडी मिळवून देतो असे सांगून शेतकऱ्यांच्या कर्जखात्यातील रक्कम माऊली एरिगेशन व भारत एरिगेशन या फर्मच्या नावावर वळती होईल, अशी योजना आखली. मात्र, नेटशेड बांधण्यात जाणूनबुजून विलंब करत निधी स्वतःच्या फायद्यासाठी वापरण्यात आला.

फिर्यादी फाळके यांच्यासह इतर सहा शेतकऱ्यांची प्रत्येकी सुमारे १३ लाख रुपयांची फसवणूक झाली आहे. यामुळे त्यांच्या नावावर बँक कर्जाचा बोजा वाढला असून फक्त फाळके यांच्या नावावरच जिजाऊ बँकेचे २९.८५ लाख रुपयांचे कर्ज थकीत आहे.

या प्रकरणी पोलीस निरीक्षक किशोर तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली माधव पाटीलला अटक करण्यात आली असून, त्याला न्यायालयात हजर केल्यानंतर तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

### गावातील नागरिकांना मूलभूत सुविधा द्या; शिवसेना ठाकरे गटाचा इशारा



**बुलढाणा/प्रतिनिधी:** सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या आदिवासी ग्रामपंचायत रसूलपूरच्या अंतर्गत येणाऱ्या राजुरा बुद्रुक या आदिवासी गावांमध्ये नागरिक वस्तीत रस्ते, नाल्या, गटर इत्यादी मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने स्थानिक ग्रामस्थ कमालीचे त्रस्त झाले आहेत. त्या ठिकाणी जिल्हा परिषद ची १ ते ५ पर्यंत शाळा असून सुद्धा त्या ठिकाणी मुलांना पिण्यासाठी शुद्ध पाण्याची व्यवस्था नाही. तर शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याची सुद्धा अवस्था दयनीय असल्यामुळे विद्यार्थ्यांना खूप त्रास सहन करावा लागतो. सर्वसामान्य नागरिकांच्या या समस्या लक्षात घेऊन जळगाव जामोद तालुका शिवसेना उबाठाच्या वतीने जळगाव जामोद पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.. मागण्या पूर्ण न झाल्यास शिवसैनिक पंचायत समिती समोर अर्धनग्न आंदोलन करतील असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे..

### ना नयनतारा, ना सामंथा, ना अनुष्का... सर्वांच्या मागून येऊन साध्यासुध्या अभिनेत्रीनं दिली 100 कोटींची हिट फिल्म

**मुंबई/प्रतिनिधी:** आधीच्या दशकांमध्ये सुपरस्टार हिरोच्या जीवावर फिल्म हिट ठरणार की, नाही? याची गणितं मांडली जायची. पण, आता फक्त हिरोच नाहीतर, हिरोईन कोण आहे? याचाही विचार केला जाऊ लागला आहे. गेल्या दहा वर्षांत हिंदी चित्रपटसृष्टीत असे अनेक चित्रपट बनलेत, ज्यात महिला अभिनेत्री मुख्य भूमिकेत आहेत. महत्त्वाचं म्हणजे, हे सिनेमे लोकांना आवडले असून सुपरहिटही ठरले आहेत. अनेक चित्रपटांनी तर शंभर कोटींच्या क्लबमध्येही एन्ट्री घेतली आहे. पण साऊथ सिनेमांमध्ये मात्र असा ट्रेंड दिसला नाही. दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत असे अनेक चित्रपट आहेत, ज्यांनी शंभर कोटींचा आकडा ओलांडला आहे, पण जवळजवळ सर्वच चित्रपट हिरोंमुळे गाजले आहेत.

पण, आता परिस्थिती हळूहळू बदलत चालली आहे, पहिल्यांदाच दक्षिणात्य चित्रपटानं शंभर कोटींचा आकडा ओलांडला आणि त्या चित्रपटात मुख्य भूमिका एका अभिनेत्रीची आहे. मल्याळम सुपरहिट चित्रपट लोका चॅप्टर १नं दक्षिण चित्रपटसृष्टीत इतिहास रचला आहे. काही दिवसांतच या चित्रपटानं देशांतर्गत बाजारात ४६ कोटींची कमाई केली, तर परदेशात या चित्रपटानं ६ दशलक्ष डॉलर्स म्हणजेच, सुमारे ५२ कोटींचं बॉक्स ऑफिस कलेक्शन केलं आहे. अशाप्रकारे, चित्रपटाचं एकूण कलेक्शन १०५ कोटींच्या पुढे गेलं आहे.

कल्याणी प्रियदर्शननं दिला १०० कोटींचा सिनेमा

लोकाच्या पहिल्या अध्यायात अभिनेत्री कल्याणी प्रियदर्शन मुख्य भूमिकेत आहे. या कामगिरीसह, हा चित्रपट दक्षिणेकडील चारही चित्रपट उद्योगांमध्ये - तमिळ, तेलगू, कन्नड आणि मल्याळम - सर्वाधिक कमाई करणारा महिला प्रमुख चित्रपट बनला आहे.

# शिर्डीत भक्ताची अनमोल भक्ती: १ कोटी ५८ लाखांचे सुवर्ण 'ॐ साई राम' अक्षरे साई चरणी अर्पण

दैनिक आपला विदर्भ

**शिर्डी/प्रतिनिधी:** श्री साईबाबांच्या चरणी अर्पण करण्यात आलेल्या भक्तीमूल्याच्या दानाने आज शिर्डीत भक्तिपूर्व वातावरण अधिकच पावन झाले. एका अनामिक साईभक्ताने आपल्या अपार श्रद्धेचे प्रतीक म्हणून तब्बल १ कोटी ५८ लाख ५० हजार ९८९ रुपये मूल्याची सुवर्ण 'ॐ साई राम' अशी दोन अक्षरे श्री साई समाधी मंदिरात अर्पण केली. ही सुवर्ण अक्षरे सुमारे १६०० ग्रॅमपेक्षा अधिक वजनाची असून, कलात्मक नक्षीकाम आणि आध्यात्मिक भावनांनी सजलेली आहेत.

**भक्ताची गुप्त पण महान भावना**


साईबाबांवरील श्रद्धेने प्रेरित होऊन या भक्ताने अनेक वर्षांपासून मनात ठेवलेली ही इच्छा अखेर पूर्ण केली. विशेष म्हणजे, या भक्ताने आपले नाव गोपनीय ठेवण्याची विनंती केली होती. साईबाबांच्या चरणी दिलेले हे दान केवळ संपत्तीचे नव्हे, तर निष्ठेचे आणि प्रेमाचे मूर्तस्वरूप आहे.


**सुवर्ण अक्षरांचे सौंदर्य आणि आध्यात्मिक महत्त्व**

'ॐ साई राम' ही सुवर्ण अक्षरे अत्यंत कुशलतेने साकारलेली आहेत. त्यावर केलेले नक्षीकाम, चमकणारे सुवर्ण, आणि त्यातून झळकणारी भक्ती हे सर्व मिळून ही अक्षरे एक दिव्य अनुभूती देतात. ही अक्षरे श्री साई समाधी मंदिरात भक्तांसाठी दर्शनार्थ ठेवण्यात आली असून, ती सर्वांच्या नजरा वेधून घेत आहेत.

**संस्थानचा गौरव व सत्कार**

ही सुवर्ण अक्षरे श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडिलकर यांच्याकडे





सन्मानपूर्वक सुपूर्त करण्यात आली. गाडिलकर यांनी संस्थानच्यावतीने या भक्ताचा सत्कार करत त्यांच्या भावना आणि दानशीलतेचे मनःपूर्वक कौतुक केले.

हे केवळ दान नाही, ही एक पवित्र भावना आहे. साईबाबांवरील श्रद्धेचे हे रूप संपूर्ण साईविश्वासाठी प्रेरणादायी आहे,'' असे गाडिलकर यांनी सांगितले.

**सर्व भाविकांसाठी दर्शनाचे नवे आकर्षण**

शिर्डीत दररोज लाखो भाविक साईबाबांचे दर्शन घेण्यासाठी येतात. आता हे सुवर्ण 'ॐ साई राम' अक्षरे त्यांच्या श्रद्धेचे एक नवे केंद्रबिंदू बनले आहे. अनेक भाविकांनी या अद्वितीय दानाबद्दल कौतुक व्यक्त केले असून, मंदिर परिसरात त्याचे विशेष आकर्षण निर्माण झाले आहे.

या भक्ताच्या अद्वितीय दानामुळे श्रद्धा, भक्ती आणि दानशीलतेचा सुंदर संगम साकारला गेला आहे. साईबाबांच्या चरणी अर्पण केलेली ही सुवर्ण अक्षरे केवळ एक मौल्यवान वस्तू नाही, तर ती एक शाश्वत भक्तीची निशाणी आहे जी आज लाखो भक्तांच्या हृदयात नवीन तेज आणि विश्वास निर्माण करत आहे.

# पाकिस्तान नव्याने उभारतोय नूरखान एअरबेस

## 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताच्या लढाऊ विमानाने केला होता विध्वंस

नवी दिल्ली : भारतीय वायुदलाने केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' मोहिमेदरम्यान पाकिस्तानला मोठा झटका दिला होता. या कारवाईत पाकिस्तान सैन्याच्या अनेक ठिकाणांवर हल्ला करण्यात आला होता. यामध्ये इस्लामाबादजवळ असलेला नूरखान एअरबेस देखील समाविष्ट होता. एनडीटीवीच्या वृत्तानुसार, पाकिस्तान सरकार आता या उद्ध्वस्त झालेल्या तळाची दुरुस्ती करण्याच्या कामात गुंतले आहे.

मॅक्सार टेक्नॉलॉजीने नूरखान एअरबेसचे नवे फोटो जारी केले असून त्यामध्ये पाकिस्तान सरकार या बेसला पुन्हा उभारण्याच्या तयारीत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. हा तळ रणनीतिक दृष्ट्या पाकिस्तानसाठी अतिशय महत्त्वाचा मानला जातो. तो इस्लामाबादपासून फक्त २५ किलोमीटर अंतरावर आहे.

मे महिन्यात झालेल्या या मोहिमेदरम्यान नूरखान एअरबेसवर मोठ्या प्रमाणावर विध्वंस झाला होता.




रनवेवर मोठमोठे खड्डे पडले होते, तर कॅम्पसचा मोठा भाग उद्ध्वस्त झाला होता. तिथे ठेवलेली शस्त्रास्त्रे आणि काही विमानं देखील नष्ट झाली होती. भारतीय वायुदलाने येथे मिसाइल आणि ड्रोन हल्ले केले होते. मात्र कोणत्या मिसाइलचा वापर करण्यात आला, याबाबत माहिती जाहीर करण्यात आलेली नव्हती.

रिपोर्टनुसार, ऑपरेशन सिंदूरदरम्यान भारतीय वायुदलाच्या सुखोई-३० विमानांवरून ब्रह्मोस मिसाइल डागण्यात आले, तर राफेल विमानांवरून स्कॅल्प मिसाइल प्रक्षेपित करण्यात आले होते. या अचूक हल्ल्यांमुळे पाकिस्तानच्या सैन्याला मोठे नुकसान झाले.

हे ऑपरेशन भारताने पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याच्या प्रत्युत्तरादाखल सुरू केले होते. या कारवाईत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये असलेली किमान नऊ दहशतवादी ठिकाणे उद्ध्वस्त करण्यात आली. प्रत्युत्तरादाखल पाकिस्तानी सैन्याने भारतातील काही शहरांवर हल्ल्याचा प्रयत्न केला, मात्र भारतीय वायुदलाच्या सजगतेमुळे त्यांचे सर्व प्रयत्न फसले. ऑपरेशन सिंदूरमुळे पाकिस्तानमध्ये प्रचंड धास्ती पसरली होती. भारतीय वायुदलाने केलेल्या अचूक हल्ल्यांमुळे पाकिस्तानच्या महत्त्वाच्या सैनिकी ठिकाणांचे नुकसान झाले. नूरखान एअरबेसची सध्या दुरुस्ती सुरू असली, तरी या कारवाईने भारताने पुन्हा एकदा आपली लष्करी ताकद जगासमोर सिद्ध केली आहे.

### भारताच्या परिवर्तनकारी सेमीकंडक्टर प्रवासावरील लेख पंतप्रधानांनी केला सामायिक

दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लिहिलेला एक लेख सामायिक केला ज्यामध्ये भारताच्या परिवर्तनकारी सेम िकंडक्टर प्रवासावर प्रकाश टाकण्यात आला आहे. सेमिकॉन इंडिया समिट २०२५ हा देखील याच मार्गाने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक भाग असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या एक्स या समाजमाध्यमावरील पोस्टला उत्तर देताना मोदी म्हणाले: ''केंद्रीय मंत्री ऽओहुळपळतरळीहपरु यांनी भारताच्या परिवर्तनकारी सेमीकंडक्टर प्रवासावर लिहिले आहे. ते सांगतात की सेमिकॉन इंडिया समिट २०२५ याच मार्गाने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक भाग आहे.

### अमेरिकेविरोधात कट रचला जातोय, किम-पुतीन यांच्या भेटीनंतर ट्रम्प भडकले; रशियाचेही उत्तर...

नवी दिल्ली : अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनच्या सैन्य परेड संदर्भात मोठं वक्तव्य केलं आहे. ट्रम्प यांनी दावा केला की, चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि उत्तर कोरियाचे नेता किम जोंग उन हे मिळून अमेरिकेविरोधात कट रचत आहेत. यावर रशियाकडून तातडीची प्रतिक्रिया समोर आली आहे. ट्रम्प यांचे वक्तव्य म्हणजे जोक असल्याचे रशियाने म्हटले. बीजिंगच्या थियानमेन चौक येथे झालेल्या भव्य परेडमध्ये आधुनिक शस्त्रास्त्रांचे , मिसाइल्सचे आणि सैन्य टुकड्यांचे प्रदर्शन करण्यात आले. यात रशिया आणि उत्तर कोरियाच्या उपस्थितीमुळे हा कार्यक्रम अधिक चर्चेत आला. यावर प्रतिक्रिया देताना ट्रम्प म्हणाले की, ''शी जिनपिंग यांनी लक्षात ठेवायला हवे की दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने चीनला परकीय आक्रमणापासून वाचवण्यासाठी मोठी मदत केली होती. अनेक अमेरिकी सैनिकांनी बलिदान दिलं आणि चीनने त्याचा आदर केला पाहिजे.'' रशियाच्या परराष्ट्र धोरण सल्लागार युरी उशाकोव यांनी सांगितले की, ''पुतिन, शी जिनपिंग आणि किम जोंग उन मिळून अमेरिकेविरुद्ध कोणताही कट रचत नाहीत. तिघांपैकी कोणाच्याही मनात तसा विचार आलेला नाही.'' बीजिंगमध्ये झालेल्या चीनी सैन्य परेड दरम्यान शी जिनपिंग यांनी अमेरिकेचा उल्लेख न करता इशारा दिला होता.

# सणासुदीच्या काळात रेशनकार्डधारकांना गव्हाचे वाटप करा : ॲड. जयश्री शेळके

## जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली मागणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्ह्यात खरीप हंगाम २०२४-२५ अंतर्गत तेरा तालुक्यांमध्ये तब्बल पाच लाख तीन हजार क्विंटल इतक्या विक्रमी प्रमाणात ज्वारीची खरेदी झाली आहे. शासन निर्णयानुसार खरेदी झालेली ज्वारी संबंधित जिल्ह्यातील रेशनकार्डधारकांना वाटप करण्याचे निर्देश आहेत. त्यानुसार सप्टेंबर २०२५ पासून जिल्ह्यातील प्राधान्य गटातील शिधापत्रिकाधारकांना प्रति व्यक्ती दोन किलो ज्वारी व तीन किलो तांदूळ तर अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांना दरमहा २५ किलो तांदूळ आणि १० किलो ज्वारीचे वाटप निश्चित करण्यात आले आहे.

तथापि, बुलढाणा जिल्ह्यास दरमहा ३९ हजार क्विंटल गहू व ६४ हजार क्विंटल तांदळाची गरज असताना गव्हाऐवजी ज्वारीचे वाटप केल्यामुळे रेशनकार्डधारकांना गहू मिळणे बंद झाले आहे. गहू हा जिल्ह्यातील जनतेच्या आहाराचा मुख्य घटक असून पोळी ही दैनंदिन ताटातील अत्यावश्यक बाब आहे. गहू उपलब्ध न झाल्यास सर्वसामान्य कुटुंबांना ज्वारीच्या भाकरीवर भागवावे लागणार असून यामुळे आहारातील समतोल बिघडून



गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

सध्या गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद, नवरात्री, दसरा आणि दिवाळी यांसारख्या महत्त्वाच्या सणासुदीचा काळ सुरू झाला आहे. गहू हा प्रत्येकाच्या अन्नसंस्कृतीशी निगडित असून ऐन सणासुदीच्या दिवसांत गव्हाच्या ऐवजी ज्वारीचे वाटप सुरू केल्याने जनतेच्या भावनांना धक्का पोहोचत आहे. अशा काळात गव्हाऐवजी ज्वारीचे वाटप करणे योग्य नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

म्हणूनच जिल्ह्यात गव्हाचे नियमित वाटप सुरू ठेवावे आणि ज्वारीचे वाटप करावयाचे असल्यास ते गहू व तांदळाच्या अतिरिक्त प्रमाणात करावे, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रवक्ता ॲड.जयश्री शेळके यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

# बुलढाणा जिल्ह्यात फक्त २७% वाहनधारकांनी बसविल्या नंबर प्लेट; ३० नोव्हेंबर २०२५ ही शेवटची मुदत

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** राज्यभरात २०१९ पूर्वी नोंदणीकृत वाहनांवर हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (HSRP) बसविण्याचे अभियान सुरू असून बुलढाणा जिल्ह्यात या अभियानास फारसा प्रतिसाद मिळालेला नाही. जिल्ह्यात नोंदणीकृत २ लाख ९० हजार २९१ वाहनांपैकी फक्त ३९ हजार २६३ वाहनधारकांनीच HSRP प्लेट बसविल्या आहेत. यामुळे केवळ २७% वाहनधारकांनीच नियमाचे पालन केल्याचे स्पष्ट होत आहे, तर उर्वरित ७३% वाहनधारक अद्यापही HSRP प्लेटपासून दूर आहेत.

राज्य सरकारने HSRP प्लेट बसविण्याच्या मुदतीत वाढ करत ३० नोव्हेंबर २०२५ ही अंतिम तारीख जाहीर केली आहे. या तारखेपर्यंत वाहनधारकांनी आपापल्या वाहनांवर प्लेट बसवणे बंधनकारक असून, यानंतर ही प्लेट नसल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

बुलढाणा उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे सहाय्यक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विवेक भंडारे यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, '' HSRP प्लेट ही केवळ नियमासाठी नाही, तर वाहनांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेदेखील अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व वाहनधारकांनी शक्य तितक्या लवकर आपल्या वाहनांवर प्लेट बसवाव्यात आणि कायदेशीर




जबाबदारी पार पाडावी.''

म्हणजे काय?

HSRP हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (HSRP) ही खास प्रकारची नंबर प्लेट आहे जी वाहन चोरीस प्रतिबंध घालते. यात एक विशेष क्रमांक, लेझर कोड आणि RFID चिप असते. यामुळे वाहनाचे ट्रॅकिंग शक्य होते आणि डुप्लिकेट नंबर प्लेट बनवणे कठीण होते.

दंड टाळण्यासाठी त्वरीत कृती आवश्यक

वाहनधारकांनी https://www.siam.in/या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपली HSRP प्लेट ऑनलाइन बुक करावी किंवा नोंदणीकृत वितरकांशी संपर्क साधून ती बसवून घ्यावी.

HSRP नंबर प्लेट बसवणे हे केवळ कायदेशीर बंधन नसून, वाहन सुरक्षेचाही एक महत्त्वाचा भाग आहे. सर्व वाहनधारकांनी ३० नोव्हेंबर २०२५ पूर्वी ही प्लेट बसवावी, अन्यथा दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल.''

विवेक भंडारे, स.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बुलढाणा.

# शिक्षकांविना शाळा... पालक पाल्यासह रस्त्यावर, प्रशासन गाफील!

## १८१ विद्यार्थ्यांचं शिक्षण धोक्यात; आंदोलनानंतर प्रशासनाचं शहाणपण जागं, तीन शिक्षकांची तातडीने नियुक्ती









दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव :** ''शाळा आहे... पण शिक्षक नाही!'' हे वास्तव बेलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गेल्या कित्येक महिन्यांपासून उघडपणे दिसत होतं. तब्बल १८१ विद्यार्थी रोज शाळेत येत होते, पण त्यांचं शिक्षण कोणाच्या तरी दयेवर सुरू होतं कारण शाळेत शिक्षक नव्हते!

शिक्षण विभागाच्या निष्काळजी कारभारामुळे अखेर पालकांनी रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेतला. सुरुवात निवेदनांनी, शेवटी रस्त्यावर लढा! पालकांनी सुरुवातीला नियमानुसार शासकीय यंत्रणेला वेळोवेळी निवेदनं दिली. पण प्रशासनाच्या कानावर उठवलेले हे आवाज दुर्लक्षितच राहिले. विद्यार्थ्यांचं शैक्षणिक नुकसान वाढू लागलं. काहींनी शाळेत येणंही थांबवलं. शेवटी पालकांनी ठरवलं आता पुरे झाले. आपल्या मुलांसाठी लढा दिला पाहिजे!

**शिक्षणासाठी मोर्चा ''आमच्या मुलांना शिक्षक द्या!''**

बेलगाव येथून पालक व विद्यार्थ्यांनी मेहकरकडे मोर्चा काढला. हातात फलक, मुखी घोषणा आणि मनात फक्त एकच मागणी ''आमच्या मुलांना शिक्षक द्या!''

या आंदोलनाचं वैशिष्ट्य म्हणजे रस्त्यावर शिक्षक द्या शिक्षण आमच्या हक्काचं नाही कोणाच्या बापाचं घोषणा देत गटशिक्षणाधिकारी यांच्या दालना शाळा भरवण्यात आली. विद्यार्थ्यांनी कवितांद्वारे, गाण्यांद्वारे आपली व्यथा मांडली आणि शासनाचा निषेध नोंदवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिकण्याच्या हक्काची आठवण करून देण्यात आली.

आंदोलनानंतर प्रशासन जागं तातडीची भेट व निर्णय या आंदोलनाची दखल घेत बुलढाणा जिल्हा शिक्षण अधिकारी आणि संबंधित गटशिक्षणाधिकारी यांनी पालकांशी चर्चा केली. परिणामी, आठ दिवसांत दोन शिक्षकांचा स्लॅब पूर्ण करणे आणि नवीन एक शिक्षक तातडीने नेमणे, असे निर्णय घेतले गेले.

आजपासून हे तिघे शिक्षक शाळेत कार्यरत झाले असून, विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झालं आहे.

**जबाबदारी कुणाची?**

परंतु, एक प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीला जबाबदार कोण?शासन आणि शिक्षण विभागाच्या नियोजनशून्यतेमुळे ही वेळ आली, हे नाकारता येणार नाही.




एकजुटीतून निर्माण झाली शक्ती

या घटनेनं एक महत्त्वाचा संदेश दिला पालक एकत्र आले, लढले... आणि विजय मिळवला!शाळा ही फक्त इमारत नाही, ती ज्ञानाचं मंदिर आहे आणि त्यात गुरू नसतील, तर त्या मंदिराचा उपयोग काय?

**हे फक्त एका गावाचं नाही...**

ही घटना केवळ बेलगावपुरती मर्यादित नाही. आज अनेक शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता ही गंभीर समस्या आहे. शिक्षक हे केवळ कर्मचारी नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या आयुष्याचे शिल्पकार आहेत. त्यांची अनुपस्थिती म्हणजे एका संपूर्ण पिढीचं नुकसान!

## विविध वृत्त...



सप्तशृंगी प्रतिष्ठान राजा डोणगाव

-----------------

## जिल्हास्तरीय आकस्मिक पिण्याचे पाणी निश्चिती समितीची सभा ५ ते १५ ऑक्टोबरदरम्यान

**बुलढाणा/प्रतिनिधी:** सन २०२५-२६ या वर्षाकरिता बुलढाणा जिल्हास्तरीय आकस्मिक पिण्याचे पाणी निश्चिती समितीची सभा पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक ५ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर २०२५ दरम्यान आयोजित करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील विविध पाटबंधारे प्रकल्पांवरून पिण्याचे पाणी आरक्षणाबाबत मागणी सादर करण्यासाठी सर्व नगरपरिषदा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पंचायत समित्या तसेच संबंधित ग्रामपंचायतींनी आपली मागणी २५ सप्टेंबर २०२५ पूर्वी न चुकता कार्यकारी अभियंता, बुलढाणा पाटबंधारे विभाग, बुलढाणा यांच्याकडे सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर सभेत प्रकल्पांमधील उपलब्ध पाणी साठ्याचा आढावा घेऊन पिण्याच्या पाण्याच्या आरक्षणास मंजुरी देण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व संबंधित बिगर सिंचन आरक्षण करणाऱ्या संस्थांनी याची नोंद घ्यावी, असे कार्यकारी अभियंता, बुलढाणा पाटबंधारे विभाग यांनी कळविले आहे.



जय श्रीराम मित्र मंडळ डोणगावं

## खामगाव येथे सोमवारी पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, बुलढाणा आणि मुलभूत प्रशिक्षण तसेच अनुषंगिक सूचना केंद्र (B.T.R.I) खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा/प्लेसमेंट ड्राईव्ह सोमवार, दि. ८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था खामगाव येथे आयोजित करण्यात आला आहे.पात्र इच्छुक युवक-युवतींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे.

या रोजगार मेळाव्यात विविध नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहून उमेदवारांच्या मुलाखती घेणार असून, प्राथमिक निवड प्रक्रियाही करण्यात येणार आहे. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे.

दहावी, बारावी, आय.टी. आय. तसेच पदवीधर अशा शैक्षणिक पात्रतेचे पुरुष आणि महिला उमेदवार या रोजगार मेळाव्यात सहभागी होऊ शकतात. उमेदवारांना आपल्या शैक्षणिक पात्रतेच्या आधारे एकापेक्षा जास्त पदांसाठी मुलाखत देण्याची संधी असेल. इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह सकाळी १० वाजता स्वखर्चाने आयटीआय खामगाव येथे हजर राहून नोंदणी करावी. यासंदर्भात अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलढाणा येथे (दूरध्वनी क्रमांक ०७२६२-२४२३४२) संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

## कायद्यात बसत असेल तर बंजारा समाजाच्या मागणीचा ही विचार होईल- मंत्री आकाश फुंडकर

**वाशिम/प्रतिनिधी:** बंजारा समाजाकडून हैद्राबाद गॅझेटियर नुसार बंजारा समाजाला ही एस टी प्रवर्गामध्ये समाविष्ट करण्याची मागणी होत असल्याने, मनोज जरांगे यांनी सुद्धा हे मान्य केले कायदेशीर बाबी तपासल्या शिवाय कोणालाही सुविधा देता येणार नाही आहे, बंजारा समाजाच्या बाबतीत ही कायदेशीर बाबी तपासून जर ते शक्य असेल तर करता येईल. असे कामगार मंत्री आकाश फुंडकर हे बंजारा समाजाच्या मागणीवर प्रतिक्रिया दिली.

## महाडीबीटीवर ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ




**बुलढाणा/प्रतिनिधी:** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी प्रणालीवर मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व इतर योजना राबविण्यात येतात. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता महाडीबीटी प्रणालीवर अर्जाची नोंदणी तसेच सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी व महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्जाची त्रुटीपुर्तता करून पात्र अर्ज दि. ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत मंजुरीकरिता समाजकल्याण कार्यालयास ऑनलाईन सादर करण्याचे आवाहन सहायक आयुक्त यांनी केले आहे.

केंद्र पुरस्कृत भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (अनुसूचित जाती प्रवर्ग) योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीचा केंद्र हिस्सा ६० टक्के केंद्र शासनाकडून प्रणालीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यात येतो. राज्य शासनाकडून शिष्यवृत्तीचा ४० टक्के हिस्सा महाडीबीटी प्रणालीद्वारे संबंधित विद्यार्थी व महाविद्यालयांना प्रदान करण्यात येतो. तेव्हा, केंद्र शासनाकडून थेट विद्यार्थ्यांना वितरीत होणारा प्रलंबित केंद्र हिस्सा ६० टक्केबाबत महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यार्थी यांनी त्रुटीची पुर्तता करावी.

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचा केंद्र हिश्याचा अदायगी करण्यात आलेल्या बाबतचा तपशिल महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध नसून दुसऱ्या हप्त्याची अदायगीची सद्यस्थिती स्वतंत्ररित्या अर्जनिहाय केंद्र शासनाच्या PFMS प्रणालीवरून https://pfms.nic.in/Home.aspx या लिंकद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या संबंधित महाविद्यालयांना उपलब्ध करून घेता येणार आहे. केंद्र शासनाच्या सुधारीत मार्गदर्शक सुचनांनुसार केंद्र हिस्सा ६० टक्के थेट विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बैंक खात्यामध्ये वितरीत होत आहे. तथापि केंद्र शासनाची अदायगी प्रलंबित असल्याबाबत विद्यार्थी, पालक, महाविद्यालय व स्थानिक संघटना यांचेकडून मोठ्या प्रमाणात पत्रव्यवहार/निवेदन तक्रारी प्राप्त होत आहेत. सदर बाब ही केंद्र शासनाशी निगडीत असल्याने, तक्रारदारांनी त्यांची तक्रार थेट पीजी पोर्टलवर Centralised Public Grievance) (https://pgportal.gov.in/Home/Lodge Grievance) नोंदणी करावे. तसेच अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे बँक खाते थेट आधार संलग्नीकृत करण्याकरिता अथवा विद्यार्थ्यांच्या आधार संबंधित अडचणींचे निराकरण करण्याकरिता https://base.npcl.org.in/catalog/homescreen या प्रणालीचा वापर करावा, अशी माहिती समाजकल्याण कार्यालयामार्फत कळविण्यात आली आहे.

## अखेर लेखी आश्वासनानंतर आमरण उपोषणाला तात्पुरती स्थगिती; फसवणूक प्रकरणावर न्यायासाठी संघर्ष सुरूच

**डोणगाव/प्रतिनिधी:** अवैध सावकारी बिसी व फायनान्स चिट्सच्या माध्यमातून लाखो रुपयांची फसवणूक झाल्याच्या आरोपांवरून डोणगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर २ सप्टेंबरपासून सुरु असलेले आमरण उपोषण अखेर ठाणेदार अमरनाथ नागरे यांच्यासह संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

उपोषणकर्ते संदीप नारायण पळसकर, गजानन सखाराम पांडव, संजय विष्णू परमाळे, सुरेश दशरथ गवळी, अमजद खान आदींनी विविध शासकीय यंत्रणांकडे तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे उपोषणाचा मार्ग स्वीकारला होता.

या प्रकरणात डोणगाव येथील गजानन त्र्यंबक आखाडे याच्यावर श्रीराम चिट्स फायनान्स कंपनीचा एजंट म्हणून काम करत असताना आयटीआर रिटर्न, फायनान्स व्यवहार, बिसी योजनांद्वारे फसवणूक केल्याचा आरोप आहे.

या संदर्भात १० फेब्रुवारी रोजी ही तक्रार देण्यात आली होती, मात्र त्यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने अखेर आंदोलकांनी आमरण उपोषण सुरु केले होते. २ सप्टेंबरपासून सुरु असलेल्या उपोषणाचा तिसरा दिवस असल्याने याची दखल घेत ठाणेदार अमरनाथ नागरे तसेच संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलकांशी चर्चा केली. पुढील कार्यवाहीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन घेऊन योग्य ती कारवाई केली जाईल व संबंधितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे लेखी आश्वासन त्यांनी दिले. त्यानंतर उपोषण



तात्पुरते स्थगित करण्यात आले. उपोषणकर्त्यांनी स्पष्ट केले की, जर प्रशासनाने वेळेत कारवाई केली नाही, तर आणखी तीव्र आंदोलन छेडले जाईल. हा लढा केवळ आमच्यासाठी नव्हे, तर समाजातील इतर फसवणूकग्रस्तांसाठीही आहे, असे त्यांनी सांगितले.